भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

---

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान**

"व्यासंगप्रिय महामानव"

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागाने, **दि. २२ एप्रिल २०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता**, आपल्या महाविद्यालयातील सेमिनार हॉल ११९ मध्ये, "व्यासंगप्रिय महामानव" या विषयावर, प्रसिद्ध लेखक, इतिहासकार आणि बाबासाहेबांच्या कार्याचे गाढे अभ्यासक श्री. सुहास सोनवणे यांचे व्याख्यान आयोजित केलेले आहे.

श्री सोनवणे यांची डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर, 'शब्दफुलांची संजीवनी', 'ग्रंथकार भीमराव', 'सत्य आग्रही आंबेडकर', 'डॉ. आंबेडकर आणि समकालीन', इ. पुस्तके प्रकाशित झालेली असून विविध वृत्तपत्रांतून लेखन, वृत्त वाहिन्यांवर मुलाखती इ. माध्यमातून त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याविषयी जनजागृतीचे काम केलेले आहे. बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील १२ शिल्पकारांवर आधारित "सचित्र भीमकालदर्शन" ही दिनदर्शिका प्रसिद्ध केली होती.

डॉ. आंबेडकरांनी आयुष्यात जे जे कार्य हाती घेतले, ते तडीस नेण्यासाठी आधी त्या कार्याची रूपरेषा आखली, चिंतनातून जे ठरवले, त्यात पुढे तीळमात्रही बदल होऊ दिला नाही. कोणत्याही गोष्टीचे अचूक नियोजन, त्यासाठी चिकाटीने प्रयत्न आणि सखोल व्यासंग हा बाबासाहेबांचा विशेष होता. बाबासाहेबांच्या या वैशिष्टयाचे व त्यांच्या जीवंन कार्याचे स्मरण म्हणून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या व्याख्यानास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मी करतो.

**डॉ. प्रियदर्शी सावंत**

**प्राचार्य**

**दि.** १५ एप्रिल २०१९

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती-‘ज्ञान दिन’

## निमित्त व्याख्यान




# “व्यासंगप्रिय महामानव”

वक्ते: श्री. सुहास सोनावणे

२२ एप्रिल २०१९, दुपारी ३.०० वाजता,
सेमिनार हॉल ११९

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, अंधेरी (प), मुंबई